# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.05.2026** **वारःशुक्रवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष निकोस ख्रिस्टोडौलाईड्स यांच्यात आज नवी दिल्लीत चर्चा
2. रेल्वे सुरक्षेसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन आणि CCTV चा वापर वाढवणार; रेल्वे मंत्रालयाची घोषणा.
3. पश्चिम बंगालमधील आर.जी. रुग्णालय दुष्कर्म प्रकरणी सीबीआयच्या विशेष तपास पथकाची स्थापना
4. पुण्याच्या गिरिप्रेमीनी सर्वोच्च एव्हरेस्ट शिखरावर पुन्हा एकदा फडकवला तिरंगा आणि
5. देशाच्या विविध राज्यांमध्ये आज उष्णतेची तीव्र लाट येण्याचा इशारा

**मोदी सायप्रस**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्ली येथे सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष निकोस ख्रिस्टोडौलाईड्स यांच्याशी चर्चा करणार आहेत. दोन्ही नेते परस्पर हिताच्या विविध क्षेत्रांमधील द्विपक्षीय सहकार्य अधिक बळकट करण्याबाबत चर्चा करतील. या क्षेत्रांमध्ये व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, शिक्षण, संस्कृती, संरक्षण आणि सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता, फिनटेक, नवोपक्रम आणि संशोधन यांचा समावेश आहे. बैठकीनंतर अनेक महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षऱ्या होण्याची अपेक्षा आहे. ख्रिस्टोडौलाईड्स राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची देखील भेट घेणार आहेत. भारत आणि सायप्रस यांच्यात दीर्घ काळापासून मैत्रीपूर्ण आणि विश्वासार्ह संबंध आहेत. पुढील वर्षी फेब्रुवारी महिन्यात दोन्ही देशांतील राजनैतिक संबंधांना 65 वर्षे पूर्ण होणार आहेत.

दरम्यान सायप्रसच्या उद्योग समूहांनी महाराष्ट्रात येऊन गुंतवणूक करावी, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. मुंबईत आयोजित सायप्रस-भारत बिझनेस फोरममध्ये ते काल बोलत होते. भारतीय उद्योगांना केवळ युरोपातच नव्हे तर पूर्व भूमध्य सागरी, आखाती आणि उत्तर आफ्रीकेतल्या देशांची बाजारपेठ खुली करून देण्यासाठी सायप्रस साहाय्य करेल अशी ग्वाही सायप्रसचे अध्यक्ष निकोस ख्रिस्टोडौलाईड्सयांनी यावेळी दिली. मुंबईत येत्या 1 सप्टेंबर पासून सायप्रस व्यापार केंद्र सुरु करण्याची घोषणाही त्यांनी केली. यावेळी दोन्ही देशांमधल्या उद्योगसंस्था आणि कंपन्यांमध्ये सहा सामंजस्य करार करण्यात आले.

**रेल्वे-सतर्कता**

रेल्वेच्या पायाभूत सुविधा आणि कामकाजाला लक्ष्य करणाऱ्या अलीकडील काही घटनांच्या पार्श्वभूमीवर, रेल्वे मंत्रालयानं प्रवाशांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे. रेल्वेच्या आवारात कोणतीही संशयास्पद हालचाल किंवा व्यक्ती आढळल्यास, त्याची माहिती त्वरित हेल्पलाइन क्रमांक 139 द्वारे द्यावी असं रेल्वे प्रशासनानं म्हटलं आहे. नवी दिल्लीतल्या 'रेल भवन' इथं काल रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या उच्चस्तरीय सुरक्षा आढावा बैठकीनंतर हे आवाहन करण्यात आलं. अलीकडं घडलेल्या काही घटना आणि आगीच्या काही घटनांमागे समाजकंटकांचा सहभाग असल्याचं प्राथमिक तपासात निदर्शनास आलं आहे. रेल्वे सुरक्षा दल या घटनांचा तपास करत आहे. प्रवासी, रेल्वे गाड्या, रेल्वे स्थानकं आणि संपूर्ण रेल्वे जाळ्याची सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी, रेल्वे प्रशासन कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन आणि सीसीटीव्ही प्रणालींसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवत असल्याचं रेल्वे विभागानं सांगितलं. हा उपक्रम मोहीम स्वरूपात राबवला जात असून, यामध्ये गुप्तचर माहिती संकलनाची क्षमता सुधारण्यावर विशेष भर दिला जात आहे.

**आयबीसीए**

येत्या एक जून रोजी नवी दिल्लीत होणारी आयबीसीए म्हणजेच पहिली इंटरनॅशनल बिग कॅट अलायन्स शिखर परिषद पुढे ढकलण्यात आली आहे. या शिखर परिषदेत सहभागी देश आणि हितधारकांशी सल्लामसलत केल्यानंतर शिखर परिषदेच्या

नवीन तारखा  जाहीर केल्या जातील,असं पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयांनं एका निवेदनात म्हटलं आहे. वाघ, सिंह, बिबट्या, हिम बिबट्या, चित्ता, जग्वार आणि प्युमा यांच्या संवर्धनासाठी आयबीसीए सुरू करण्यात आलं असून आयबीसीएची स्थापना भारत सरकारनं 2024 मध्ये, पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या अंतर्गत, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण या नोडल संस्थेमार्फत केली.

**आरजीकर**

कलकत्ता उच्च न्यायालयाने 'आर.जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील  बलात्कार आणि हत्या प्रकरणाचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. तीन सदस्यांच्या या विशेष तपास पथकाचे नेतृत्व केंद्रीय अन्वेषण विभागाच्या पूर्व विभागाचे सहसंचालक करतील. न्यायालयाने या पथकाला 25 जूनपर्यंत आपला अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. पीडितेच्या कुटुंबीयांनी पुराव्यांशी छेडछाड झाल्याचा आणि वस्तुस्थिती दडपली गेल्याचा वारंवार आरोप केल्यानंतर, न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.

**मार्को रुबिओ**

भारताला जितकी ऊर्जा खरेदी करण्याची इच्छा असेल, तितकी ऊर्जा विकण्यास अमेरिका तयार आहे असं प्रतिपादन अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी केलं आहे.

होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे ऊर्जेच्या वाढत्या किमतींचा भारतावर होत असलेल्या परिणामांबद्दल विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी हे विधान केले. स्वीडन आणि भारताच्या दौऱ्यावर निघण्यापूर्वी, मियामी येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी ही माहिती दिली. भारत हा आपला एक 'उत्तम भागीदार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. रुबिओ उद्यापासून 26 मे पर्यंत भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत. 'क्वाड' गटाची बैठक या महिन्याच्या 26 तारखेला नियोजित आहे. या बैठकीला रुबिओ, ऑस्ट्रेलियाच्या परराष्ट्र मंत्री पेनी वोंग आणि जपानचे परराष्ट्र मंत्री मोतेगी तोशिमित्सू उपस्थित राहणार असून, भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत.

**माऊंट एव्हरेस्ट चढाई**

पुण्यातील गिरिप्रेमी संस्थेच्या सदस्यांनी आणखी एकदा माऊंट एव्हरेस्टवर  चढाई पूर्ण केली असून या सर्वोच्च शिखरावर काल सकाळी तिरंगा फडकवला. विवेक शिवडे, मिहिर जाधव, अखिल काटकर या गिरीप्रेमीच्या सदस्यांना उरजेन शेरपाआणि लकपा शेरपा यांनी सहकार्य केलं. गिरिप्रेमीच्या सदस्यांनी आतापर्यंत चार वेळा एव्हरेस्ट शिखर यशस्वीपणे सर केलं आहे. याविषयी गिरीप्रेमीचे उमेश झिरपे एव्हरेस्ट इथल्या बेस कॅम्पवरुन आकाशवाणीला अधिक माहिती देताना म्हणाले.....

**गिरीप्रेमी एव्हरेस्ट वीस सव्वीस या मोहिमेचा नेता एव्हरेस्टच्या बेस कॅम्प वरून आपल्याशी संवाद साधत आहे. आज सकाळी पावणे सहा वाजता गिरीप्रेमीच्या तीन गिरारकांनी जगातील सर्वोच्च शिखर माउंट एव्हरेस्ट वरती भारताचा तिरंगा आणि महाराष्ट्राचा भगवा फडकावला. ही एक खूप आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. संपूर्ण महाराष्ट्रवासियां संपूर्ण देशवासीयांसाठी ही एक अभिमानाची गोष्ट आहे. या अत्यंत खडतर मोहिमेमध्ये या तिन्ही गिर्यारोकांनी खूप चांगली कामगिरी करून आज शिखरमात्यावरती पोहोचण्यात यश मिळवलं. या मोहिमेसाठी मदत करणाऱ्या सर्व देणगीदारांचे सर्व गिरीप्रेमींचे हितचिंतकांचे मी मनापासून आभार मानतो.**

**पुलवामा सूत्रधार**

2019 च्या पुलवामा दहशतवादी हल्ल्यामागील प्रमुख सूत्रधारांपैकी एक मानला जाणारा हमजा बुरहान हा, काल पाकिस्तान-व्याप्त काश्मीरमध्ये काही अज्ञात बंदूकधाऱ्यांनी केलेल्या गोळीबारात ठार झाला. पुलवामा हल्ल्यानंतर तो पाकव्याप्त काश्मीरमध्ये शिक्षक असल्याचं सांगून लपून राहत होता. हल्लेखोरांनी अगदी जवळून त्याच्यावर गोळ्या झाडल्या. बुरहानच्या डोक्यात तीन गोळ्या लागल्याचे पोलिसांनी पत्रकारांना सांगितले. पोलिसांनी या हल्ल्याप्रकरणी एका संशयिताला अटक केल्याचा आणि हल्ल्यात वापरलेले शस्त्र जप्त केल्याचाही दावा केला आहे. हमजा बुरहान पाकिस्तानमधील 'अल बद्र' या

दहशतवादी संघटनेत सामील झाला होता आणि या संघटनेच्या दहशतवादी कारवायांसाठी आर्थिक रसद पुरवत होता. 2019 मध्ये झालेल्या पुलवामा हल्ल्यात सीआरपीएफच्या 40हून अधिक जवानांना वीरमरण आलं होतं.

**एआय चित्रपट**

कान चित्रपट महोत्सवात काल जगातील पहिलापूर्णपणे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून तयार करण्यात आलेला चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. 'Hell Grind' असे नाव असलेला हा 95 मिनिटांचा चित्रपट 15 जणांनी मिळून केवळ 14 दिवसांत आणि अंदाजे 5 लाख अमेरिकन डॉलर्सच्या खर्चात हा चित्रपट तयार केला आहे.

**पुरस्कार**

भारताच्या 'चंद्रयान-3' या चांद्रमोहिमेला 'अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ एरोनॉटिक्स अँड ॲस्ट्रोनॉटिक्स'कडून 2026 चा 'गॉडार्ड ॲस्ट्रोनॉटिक्स पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आलं आहे. अमेरिकेतील भारताचे राजदूत विनय क्वात्रा यांनी 'भारतीय अंतराळ संशोधन संस्थे'च्यावतीने हा पुरस्कार स्वीकारला.

23 ऑगस्ट 2023 रोजी, 'चंद्रयान-3' चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ 'सॉफ्ट लँडिंग' करणारे ते पहिलेच अंतराळयान ठरले. चंद्राचा हा दक्षिण ध्रुव प्रदेश वैज्ञानिक आणि सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा मानला जातो आणि यापूर्वी कधीही या प्रदेशाचे पृष्ठभागावरील स्तरावर संशोधन किंवा अन्वेषण करण्यात आले नव्हते.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये, काल रात्री अहमदाबाद इथं झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सने चेन्नई सुपर किंग्सचा 89 धावांनी पराभव केला. गुजरात टायटन्सने दिलेल्या 230 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, चेन्नई सुपर किंग्सचा संघ 140 धावांवर बाद झाला. मोहम्मद सिराजला 'सामनावीर' म्हणून गौरवण्यात आले. आज, हैदराबाद इथं सनरायझर्स हैदराबाद आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सामना होणार आहे.

**यूपी उष्णता**

संपूर्ण उत्तर प्रदेशात सध्या तीव्र उष्णतेची लाट आहे. बांदा जिल्ह्यात देशातील सर्वाधिक 47 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

महाराष्ट्रात विदर्भातही बहुतांश ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. काल वर्धा इथं 47 पूर्णांक 1 दशांश अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवलं गेलं.

भारतीय हवामान विभागाने उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि विदर्भात आज उष्णतेची तीव्र लाट येण्याचा इशारा दिला आहे.

दिल्ली, हरियाणा, पंजाब, बिहार, राजस्थान, तेलंगणा आणि ओडिशासह अनेक राज्यांत उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. तर  इशान्ये कडील राज्यांमध्ये आणि कर्नाटकमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं , नमस्कार.**